# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४

क्र.कोविमं/माध्य.गोप./ 5816
कोल्हापूर-४१६ ००४.
दिनांक :- १०.१२.२०२०

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालये,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर- ४१६००४.

**विषय :- माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविदयालयाचे प्रोफाईल भरणेबाबत.**
**संदर्भ :- १) क्र.रा.मं./परीक्षा-८/३४०४, पुणे, दिनांक ०५/०८/२०२० चे पत्र.**
**२) क्र.रा.मं./परीक्षा-८/५०९२, पुणे, दिनांक ०७/१२/२०२० चे पत्र.**

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविदयालयांकडून वेळोवेळी अदययावत माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी प्रोफाईल भरण्याबाबत यापूर्वीच्या पत्रांव्दारे मुदतवाढ देण्यात आलेली होती, तथापि कोविड - १९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविदयालये विदयार्थ्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीसह सुरु झालेली नसल्यामुळे काही माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविदयालयांची प्रोफाईल भरण्याबाबतची प्रक्रिया अदयापही अपूर्ण आहे. त्यामुळे शाळा व कनिष्ठ महाविदयालयांना प्रोफाईल भरण्यासाठी अथवा भरलेली माहिती दुरुस्त करण्यासाठी पुन:श्च दिनांक १४ डिसेंबर २०२० ते ३१ डिसेंबर २०२० पर्यन्त शाळा / कनिष्ठ महाविदयालयांना माहिती भरण्याकरिता मुदत देण्यात येत आहे. **दुरुस्ती करतांना १० वी शिकविणाऱ्या शिक्षकांची माहिती भरतांना गणित भाग-१ बिजगणित, गणित- २ भूमिती, शास्त्र भाग-१ व २ तसेच सामाजिक शास्त्रे विषयास इतिहास व भूगोल शिकविणाऱ्या शिक्षकांची माहिती दर्शवून सुधारणा करणे अनिवार्य आहे.**

सन २०२१ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी ) परीक्षेची आवेदनपत्रे भरुन घेण्याच्या कार्यवाहीपूर्वी शाळा / कनिष्ठ महाविदयालयांनी प्रोफाईल भरावी. **प्रोफाईल भरुन घेतल्यानंतरच शाळांना व कनिष्ठ महाविदयालयांना एक युनिक नंबर देण्यात येणार आहे. सदर युनिक नंबरच्या आधारे परीक्षेची आवेदनपत्रे भरण्यासाठी लॉग-ईन करता येईल, अन्यथा आवेदनपत्रे भरता येणार नाही याची नोंद घ्यावी. अन्यथा याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील.**

सुधारित माहिती भरलेली प्रोफाईल प्रत (Hard Copy) पोष्टाने अथवा हस्तपोच त्वरित या कार्यालयास सादर करावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत माहितीस्तव,:- सचिव, महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ,भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-.०४